# सेवाविषयक बाबीसंबंधी सामान्य प्रशासन विभागास दाखविणे आवश्यक असणारी प्रकरणे

भाग

१

**<u>सेवा विषयक बाबींसंबंधीची प्रकरणे.</u>**
**मा.मुख्यमंत्र्यांना सादर करणे आणि सामान्य प्रशासन विभागास दाखविणे आवश्यक असणा-या प्रकरणांची यादी.**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००५/प्र.क्र.५/०५/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २६.६.२००६.

वाचा- (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०७५/दहा, दि.२४.७.७५,
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०७५/दहा, दि.१२.१२.७५,
(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०७८/दहा, दि.१३.११.७८,
(४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०९०/प्र.क्र.१/९०/१२, दि.१०.५.१९९०,
(५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०९०/प्र.क्र.१/९०/१२, दि.२९.४.१९९२.

## <u>परिपत्रक</u>

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०७५/१०, दिनांक २४.७.१९७५ आणि वर उल्लेख केलेल्या निरनिराळ्या परिपत्रकान्वये केलेल्या सुधारणांसह शासन सेवेतील सेवकांच्या सेवाविषयक बाबींसंबंधीची कोणती प्रकरणे मा.मुख्यमंत्र्यांना सादर करणे आवश्यक आहे, कोणती प्रकरणे सामान्य प्रशासन विभागास दाखविणे आवश्यक आहे व कोणती प्रकरणे दाखविणे आवश्यक नाही, याबाबतच्या सूचना मंत्रालयीन विभागांना दिलेल्या आहेत. आता उपरोल्लेखित परिपत्रकांचा सर्वंकष आढावा घेऊन, या सर्व आदेशांचा एकत्रितपणे विचार करुन, त्यात दरम्यानच्या काळात झालेल्या प्रशासकीय सुधारणा आणि अधिकारांचे केलेले प्रत्यायोजन लक्षात घेऊन वरील आदेशांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. तसेच पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार वेतनाच्या किमान टप्प्यांमध्ये झालेले बदल विचारात घेऊन, या प्रकरणी वित्त विभागाचे आणि सामान्य प्रशासन विभागाच्या सेवा विभागातील कार्यासनांचे अभिप्राय घेऊन पूर्वी केलेल्या वर्गीकरणात सुधारणा करुन विवरणपत्र 'अ', 'ब', 'क' व 'ड' सुधारित करण्यात आली आहेत.

२. सर्व मंत्रालयीन विभागाना कळविण्यात येते की, मा.मुख्यमंत्री आणि सामान्य प्रशासन विभागास सेवाविषयक प्रकरणे सादर करताना सोबत जोडलेल्या विवरणपत्र 'अ', 'ब', 'क' व 'ड' मध्ये दिलेल्या प्रकरणांच्या सुधारित सूचीनुसार कार्यवाही करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०६२९१५५१४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.कृ.लोखंडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

## विवरणपत्र 'अ'

***अंतिम निर्णयासाठी मा.मुख्यमंत्र्यांना सादर करावयाची सेवाविषयक बाबींची प्रकरणे :-***

१ अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या, तसेच राज्य सेवेतील विभाग प्रमुख / प्रादेशिक विभाग प्रमुख किंवा ज्या पदाच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.१०६५०/- आहे, त्या किंवा त्यापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन घेणारे गट 'अ' चे इतर अधिकारी यांच्या नेमणुका, बदल्या, पदस्थापनेची प्रकरणे.

२ मंत्रालयीन सेवेतील उपसचिव व त्यापेक्षा वरील दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि पदस्थापना.

३ अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांविरुद्धची शिस्तभंगविषयक प्रकरणे तसेच विभागीय/प्रादेशिक विभागप्रमुख दर्जाचे तसेच त्यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी, विविध महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि रु.१०६५०/- हा किमान टप्पा असलेल्या वेतनश्रेणीतील गट 'अ' मधील सर्व अधिकाऱ्यांविरुद्धची शिस्तभंगविषयक प्रकरणे.

४ सामान्य प्रशासन विभागाने सेवाविषयक बाबींच्या मंत्रालयीन विभागांच्या प्रकरणांत दिलेला सल्ला, मंत्रालयीन विभागांच्या स्तरावर किंवा प्रभारी मंत्र्यांच्या स्तरावर अस्वीकृत करावयाची प्रकरणे.

५ राज्य सेवेतील विभागप्रमुख व त्या दर्जाचे प्रादेशिक विभागप्रमुख; विविध महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि रु.१६४००/- हा किमान टप्पा असलेल्या वेतनश्रेणीतील गट 'अ' मधील इतर सर्व अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल. (अखिल भारतील सेवेमधील अधिकाऱ्यांबाबत संबंधित प्रशासकीय विभागांनी म्हणजे सामान्य प्रशासन विभाग, गृह आणि महसूल व वन विभाग यांनी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी.)

६ गट 'अ' मधील अधिकाऱ्यांविरुद्धच्या विभागीय चौकशी पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा ३ वर्षांच्या पुढे वाढवून देण्याची प्रकरणे.

७ सेवानिवृत्तीनंतरची पुनर्नियुक्ती, कंत्राटी पद्धतीवर करण्यात येणाऱ्या नियुक्तीसंबंधीची प्रकरणे.

८ सेवाविषयक नियम, शासन निर्णय / आदेश यामधील तरतूदीत शिथिलता देण्याची प्रकरणे.

९ राजपत्रित गट-अ व गट-ब ची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित (de-reserve) करण्यासंबंधीचे तसेच राजपत्रित गट-अ व गट-ब च्या निवडसूचीतील मागासवर्गीयांच्या अधिक्रमणास मान्यता देण्याचे प्रस्ताव

## विवरणपत्र 'ब'

**शासनाचे आदेश प्राप्त करण्यापूर्वी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय मिळविणे आवश्यक असलेली प्रकरणे:-**

१ सेवाविषयक नियम किंवा शासन निर्णय/आदेशात शिथिलीकरण अपेक्षित असलेली प्रकरणे.

२ विहित कार्यपद्धती अनुसरुन मान्य झालेल्या निवडसूचीतील किंवा आस्थापना मंडळाच्या शासनाने मान्य केलेल्या शिफारशीव्यतिरिक्त इतर प्रकरणात राजपत्रित पदांवर पदोन्नतीने नियुक्त करावयाची प्रकरणे.

३ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील परंतु आयोगाच्या सहमतीशिवाय देण्यात आलेल्या पदोन्नत्या १ वर्षापेक्षा पुढे चालू ठेवण्याबाबतची प्रकरणे.

४ आस्थापना मंडळांना सादर करावयाचे प्रस्ताव.

५ आस्थापना मंडळाच्या कक्षेत येणाऱ्या प्रकरणांखेरीज; भारतीय प्रशासन सेवेतील आणि राज्य सेवेतील इतर राजपत्रित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण; फेलोशिप साठी पाठवावयाची प्रकरणे.

६ गट 'अ' मधील अधिकाऱ्यांविरुद्धची शिस्तभंगविषयक प्रकरणे (शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करतांना तसेच शिक्षेचे प्रस्ताव अंतिम करतांना अशा दोन्ही वेळेस)

७ राजपत्रित गट 'ब' अधिकाऱ्यांच्या ज्या शिस्तभंगविषयक प्रकरणात जबरी शिक्षा प्रस्तावित आहे अशी प्रकरणे (अंतिम टप्प्यात)

८ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ च्या नियम ७ (६) खालील तरतुदीनुसार जेथे शिस्तभंगविषयक प्राधिकरण हे शासन असेल तेथे मंजूर करावयाचे अनुकंपा निवृत्तीवेतन (Compassionate Pension)

९ विभागीय चौकशी नियमपुस्तिका, १९९१ च्या परि.३.१९ नुसार विभागीय चौकशीच्या प्रकरणात चौकशा पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा वाढविण्याबाबतची प्रकरणे.

१० राजपत्रित अधिकाऱ्यांना पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याची प्रकरणे तसेच म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियमातील नियम ३२ चे शिथिलीकरण अपेक्षित असलेली अराजपत्रित कर्मचाऱ्यांची मानीव दिनांकाची प्रकरणे.

११ शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीनंतर पुनर्नियुक्ती / कंत्राटी पद्धतीवर करण्यात येणाऱ्या नियुक्त्या.

१२ राजपत्रित अधिकाऱ्यांच्या जन्मतारखेत बदल करण्याची प्रकरणे.

१३ सेवाविषयक बाबींची प्रकरणे विचार विनिमयासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठवावयाचे प्रस्ताव / पत्रे.

१४ अंतिम निर्णयासाठी मा.मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात येणारी प्रकरणे, त्यात सेवाविषयक व आरक्षणविषयक बाबी अंतर्भूत असल्यास त्या अनुक्रमे अपर मुख्य सचिव (सेवा)/अपर मुख्य सचिव (सा.वि.स.)/प्रधान सचिव यांचेमार्फत मा.मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात यावीत.

१५ मंत्रालयीन विभागातील व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील सर्व संवर्गातील आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित (de-reserve) करण्यासंबंधीचा प्रस्ताव.

१६ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठवायची मागणीपत्रे.

## विवरणपत्र 'क'

### मा.मुख्यमंत्र्यांना सादर करण्याची आवश्यकता नसलेली प्रकरणे.

१ विभागीय, प्रादेशिक विभाग प्रमुख आणि वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.१०६५०/- पेक्षा कमी असलेल्या गट 'अ' मधील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, पदस्थापना आणि बदल्यांची प्रकरणे.

२ विभागप्रमुख आणि मंत्रालयातील सचिवांपेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या रजेची तसेच त्या काळातील कामाचा अतिरिक्त कार्यभार इ.व्यवस्था करण्याची ज्यामध्ये दीर्घ मुदतीची पदोन्नती उद्‌भवत नसतील अशी प्रकरणे.

३ मंत्रालयातील अवर सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदल्यांची प्रकरणे.

४ राज्य सेवेतील अधिकारी / विभागीय / प्रादेशिक विभाग प्रमुख / विविध महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, तसेच रु.१६४००/- किंवा त्यापेक्षा अधिक वेतनश्रेणीचा किमान टप्पा असलेल्या वेतनश्रेणीतील वेतन घेणाऱ्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतर राजपत्रित अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल.
(अखिल भारतील सेवेमधील अधिकाऱ्यांबाबत संबंधित प्रशासकीय विभागांनी म्हणजे सामान्य प्रशासन विभाग, गृह आणि महसुल व वन विभाग यांनी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी.)

५ ज्या प्रकरणात दक्षतारोध पार न करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेतलेली असेल अशी प्रकरणे.

६ अखिल भारतीय सेवेतील अधिकारी किंवा विभागीय किंवा प्रादेशिक विभाग यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी, विविध महामंडळांचे व्यवस्थापकीय संचालक आणि रु.१०६५०/- वेतनश्रेणीचा किमान टप्पा असलेल्या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांची शिस्तभंग विषयक प्रकरणे.

७ विभाग प्रमुख व त्या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या रजा मंजुरीची प्रकरणे

८ गट 'अ' च्या अधिकाऱ्यांना निवृत्तीपूर्व रजा नामंजूर करावयाची प्रकरणे.

## विवरणपत्र 'ड'

### सामान्य प्रशासन विभागाला सादर करण्याची आवश्यकता नसलेली प्रकरणे

१ बदल्यांच्या कायद्यामधील तरतूदीनुसार बदली करण्यासंबंधीची प्रकरणे.

२ राजपत्रित अधिकाऱ्यांना दक्षतारोध पार करण्याची अनुमती देण्यासंबंधीची प्रकरणे.

३ गट 'अ' व 'ब' च्या अधिकाऱ्यांना दक्षतारोध ओलांडण्यास अनुमती न देण्याची प्रकरणे

४ मान्य झालेल्या निवडसूचीतील अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबतची प्रकरणे.

५ राजपत्रित अधिकाऱ्यांचेबाबत निवृत्तीपूर्व रजा नामंजूर करण्याच्या प्रकरणाव्यतिरिक्त राजपत्रित अधिकाऱ्यांच्या रजेची इतर प्रकरणे.

६ गट 'ब' मधील अधिकाऱ्यांच्याबाबत निवृत्तीपूर्व रजा नाकारण्याची प्रकरणे

७ अराजपत्रित कर्मचाऱ्यांविरुद्धची शिस्तभंगविषयक प्रकरणे.

८ अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे किंवा त्याने आदेशाचा भंग केल्यामुळे शासनाला झालेल्या कोणत्याही आर्थिक स्वरुपाच्या हानीची संपूर्ण रक्कम किंवा तिचा भाग त्यांच्या वेतनातून वसूल करणे या शिक्षेव्यतिरिक्त किरकोळ शिक्षा देण्याचे प्रस्तावित असलेल्या राजपत्रित अधिकारी गट 'ब' अधिकाऱ्यांची शिस्तभंगविषयक प्रकरणे

९ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत नसलेल्या पदांकरिता मागणीपत्र संबंधित प्रधिकाऱ्यांना पाठविण्याबाबतची प्रकरणे.

१० राजपत्रित कर्मचाऱ्यांना त्यांच्या गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे कळविणेबाबत.

११ राजपत्रित अधिकाऱ्यांचेबाबतीत त्यांचा परिविक्षा कालावधी (१ वर्ष) पुढे वाढविण्याची किंवा त्यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्याची प्रकरणे.

१२ गट 'अ' व 'ब'च्या राजपत्रित परिविक्षाधीन अधिकाऱ्याला परिविक्षा कालावधी समाधानकारक नसल्याच्या कारणास्तव सेवेतून मुक्त करणे.

१३ शासकीय कर्मचाऱ्याला राज्यात प्रशिक्षण देण्याची प्रकरणे.

१४ चारीत्र्य व वर्तणुक याची पडताळणी करण्याची प्रकरणे.

१५ चर्चासत्रे आणि परिषदा यांना उपस्थित राहण्यास अनुमती देण्याची प्रकरणे.

१६ अधिकारी/कर्मचाऱ्याची ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे व ज्येष्ठतेचे विनियमन नियमानुसार ज्येष्ठतेबाबतची अभिवेदने निकालात काढणे.

१७ राजपत्रित अधिकाऱ्यांना सेवेत कायम (Confirm) करण्याची प्रकरणे.

१८ राजपत्रित अधिकाऱ्याच्या राजीनाम्याची प्रकरणे.

१९ म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियमातील नियम ३२ चे शिथिलीकरण प्रस्तावित नसलेली अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे मानीव दिनांक देण्याची प्रकरणे.

२० महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविलेल्या प्रस्तावासंबंधी आयोगाने मागणी केलेली अतिरिक्त माहिती आयोगास पाठविण्याची प्रकरणे.

२१ अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या जन्मतारखेत बदल करण्याची प्रकरणे.

# शासन सेवेतील निरनिराळया वेतनश्रेणीतील पदांचे वर्गीकरण

भाग

२

**राज्य शासन सेवेतील भिन्नभिन्न वेतनश्रेणीतील पदांचे वर्गीकरण.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय,क्रमांक:एसआरव्ही-१०९८/१६४४/प्र.क्र.२/९९/बारा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २ जुलै,२००२.

वाचा - १] शासन निर्णय,सा.प्र.वि.एसआरव्ही- १०८८/प्र.क्र.१३/८८/बारा, दिनांक २९ जुलै,१९९३.
२] केंद्र शासनाचे कार्मिक व प्रशिक्षण विभागाचे कार्यालयीन आदेश क्रमांक -१३०१२/१/९८/इएसटीटी [डी], दि.१२ जून,१९९८.

**शासन निर्णय**

चौथ्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने वेतनश्रेणीनुसार ज्याप्रमाणे पदांचे वर्गीकरण केले, त्या धर्तीवर राज्य शासनाने परिस्थितीनुरुप काही बदल करुन, राज्य शासन सेवेतील पदांचे वर्गीकरण उपरोल्लेखित दि.२९ जुलै,१९९३ च्या शासन निर्णयानुसार केले.

२. आता राज्य शासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारीत वेतनश्रेणी मंजूर केल्या असल्याने, उपरोल्लेखित दि.२९ जुलै,१९९३ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन, राज्य शासन सेवेतील पदांचे सुधारीत वेतनश्रेणीनुसार खालीलप्रमाणे नव्याने वर्गीकरण करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदांचा तपशिल | पदांचे वर्गीकरण |
|---|---|---|
| १. | ज्या पदांचे वेतन किंवा पदाच्या वेतनश्रेणीची कमाल मर्यादा रु.११,५००/- पेक्षा कमी नाही, अशी पदे, | गट - अ |
| २. | ज्या पदांचे वेतन किंवा पदाच्या वेतनश्रेणीची कमाल मर्यादा रु.९,०००/- पेक्षा कमी नाही आणि रु.११,५००/- पेक्षा कमी आहे, अशी पदे, | गट - ब |
| ३. | ज्या पदांचे वेतन किंवा पदाच्या वेतनश्रेणीची कमालमर्यादा रु.४,४००/- पेक्षा कमी नाही आणि रु.९,०००/- पेक्षा कमी आहे, अशी पदे, | गट - क |
| ४. | ज्या पदांचे वेतन किंवा पदाच्या वेतनश्रेणीची कमालमर्यादा रु.४,४००/- पेक्षा कमी आहे, अशी पदे. | गट - ड |

३. अ) जुन्या वर्गीकरणानुसार ज्या पदांचा दर्जा "अराजपत्रित" समजला जातो, तोच दर्जा सुधारीत वर्गीकरणानंतरही कायम राहील. तसेच ज्या पदांना अगोदरच राजपत्रित दर्जा घोषित केला आहे, त्या पदांचा तो दर्जा यापुढेही कायम राहील. अराजपत्रित पदांना केवळ वेतनश्रेणीच्या आधारे किंवा विशिष्ट गटामधील समावेशनामुळे आपोआप राजपत्रित दर्जा प्राप्त होणार नाही.

ब) विद्यमान वर्गीकरणानुसार ज्या पदांकरीता मागासवर्गीयांचे आरक्षण लागू आहे त्या पदांचे सुधारीत वर्गीकरणानुसार गट बदलत असले तरी, त्या पदांना मुळ दर्जा कायम रहात असल्याने विद्यमान तरतुदीनुसार त्या पदांकरीता आरक्षण यापुढेही कायम राहील.

४. सेवेत नियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी पदनिर्मितीच्या आदेशामध्ये ज्या पदांचा उल्लेख विवक्षितपणे गट-क (वर्ग-३) असा आहे व विद्यमान वर्गीकरणानुसार ती पदे गट-ड संवर्गामध्ये अंतर्भूत होत असतील, तर अशी

पदे गट-क संवर्गामध्ये असल्याचे मानण्यात यावे. संबंधित पदधारकांच्या बाबतीत गट-क प्रमाणे सध्याच्या सेवाशर्ती/सवलती लागू आहेत, त्यामध्ये बदल करण्यात येऊ नये.

५. विद्यमान गट - ड संवर्गामधील काही वेतनश्रेणीतील पदे, सुधारीत गट - क संवर्गामध्ये अंतर्भूत होतील, त्यामुळे त्यांच्या सेवाशर्ती व सवलतींमध्ये काही संदिग्धता निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे, विद्यमान वर्गीकरणाप्रमाणे जी पदे वेतनश्रेणीनुसार गट - ड ची समजली जात आहेत, ती पदे सुधारीत वर्गीकरणामुळे गट- क मध्ये अंतर्भूत होणार असली तरी, त्या वेतनश्रेणीतील पदधारकांच्या बाबतीत गट-ड प्रमाणे सध्या ज्या सेवाशर्ती/ सवलती लागू आहेत, त्यामध्ये बदल करण्यात येऊ नये.

६. राज्य शासन सेवेतील ज्या पदांना विद्यापीठ अनुदान आयोगाची वेतनश्रेणी लागू आहे त्या पदांना हे वर्गीकरणाचे आदेश लागू होणार नाहीत. अशा पदांबाबत संबंधित विभागांनी स्वतंत्रपणे निर्णय घ्यावेत.

७. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक-११३०३/सेवा-१०, दिनांक २२ मे, २००० अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रकाश लोखंडे
उप सचिव , महाराष्ट्र शासन

# पदभरती

भाग

३

**Employment Exchanges--**
Recruitment of Class III and Class IV servants in Government Service through the-

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,**
Circular No.RTR-1068/C-10091/J,
Sachivalaya, Bombay-32 (BR), 2nd December 1968.

**CIRCULAR**

Orders have been issued under Government circular, Political and Services Department No.RTR-1056/J, dated the 23rd October 1956 directing the appointing authorities that vacancies which are likely to last for more than a month and which are not required to be filled by promotion or through the Public Service Commission should be notified to the local Employment Exchanges with a request to depute suitable candidates for appointment therein and the vacancies which are not likely to last for more than a month need not be reported to the Employment Exchanges, if the appointing authorities concerned are satisfied that there is no adequate time to obtain candidates from Employment Exchanges. It has noticed by Government that despite the above order candidates are being recruited to Class III and Class IV posts,otherwise than through the Employment Exchanges and hence with view to putting a stop to this irregularity, Government again issued orders under Government Circular, General Administration Department No.RTR-1065/J, dated the 23rd August 1965 to the effect that the appointing authorities should take particular care to see that Government orders conveying the need of making recruitment through the Employment Exchanges are followed scrupulously and even where in view of urgency they are forced to make appointments directly without reference to the Employment Exchanges they should ensure that the persons so appointed are not continued in service for more than three months and that they are replaced by persons recruited through the Employment Exchanges within this period.

2. It has come to the notice of Government that instead of interpreting the orders contained in Government circular, General Administration Department No.RTR-1065/J, dated the 23rd August 1965 as a measure to avoid immediate dislocation of work, some appointing authorities have misinterpreted them as a permission to make direct recruitment upto a period of three months straightway without making any effort to obtain candidates from the Employment Exchanges for temporary vacancies which are likely to last upto three months. It is, therefore, specifically brought to the notice of all the appointing authorities that it is only permissible to make direct appointments without reference to the Employment Exchanges for vacancies in Class III and Class IV posts which are not likely to last for more than month and the appointing authorities are satisfied that there is no adequate time to obtain candidates from the Employment Exchanges. If such posts are likely to continue beyond one month for any reason the appointing authorities should see that the persons appointed directly are replaced by Employment Exchange candidates as early as possible and in any case within three months. This should not be interpreted as a permission to make direct recruitment to vacancies which are likely to last upto a period

of three months. It is in very exceptional circumstances that the candidates recruited otherwise than through the Employment Exchanges should continue beyond one month and in no case should they be continued beyond three months.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

S.M. Laxame
Under Secretary to the Government of Maharashtra
General Administration Department.

<u>सेवायोजन कार्यालय</u>
शासनाच्या चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या मुलास/अविवाहीत मुलीस शासनाच्या सेवेत नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयाच्या शिफारशीची अट रद्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-आरटीआर-१०८०/८१९/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १४ एप्रिल, १९८१.

## परिपत्रक

सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-आरटीआर-१०६८/सी/१००९१ दिनांक २ डिसेंबर,१९६८ च्या शासन परिपत्रकानुसार तृतीय व चतुर्थ श्रेणीतील एक महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरिता भरण्यात येणाऱ्या पदांवर सेवायोजन कार्यालयाने पुरस्कृत केलेल्या उमेदवारांतूनच नेमणूक करावी असे बंधन आहे. प्रस्तुत आदेश शिथिल करुन चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचारी अथवा या श्रेणीतील एक वर्षाच्या कालावधीमध्ये निवृत्त होणारे कर्मचारी यांच्या मुलास/अविवाहित मुलीस शासन सेवेतील चतुर्थश्रेणी पदावरील नोकरीसाठी विशेष बाब म्हणून सेवायोजन कार्यालयाच्या शिफारशीची अट खालील शर्तीवर रद्द करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

१) उमेदवारांनी चतुर्थ श्रेणीतील पदांकरिता विहित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमातील शैक्षणिक अर्हता, वय या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.
२) चतुर्थ श्रेणीतील निवृत्त किंवा एक वर्षाच्या कालावधीमध्ये निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या फक्त एका मुलास किंवा अविवाहित मुलीस फक्त चतुर्थ श्रेणीतील पदांवरील नेमणूकीकरिता सेवा योजन कार्यालयाच्या शिफारशीची अट रद्द करण्याची सवलत दिली जाईल.
३) सेवायोजन कार्यालयाच्या शिफारशीची अट जरी रद्द करण्यात आली असली तरी अर्जदार उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी आपले नाव स्थानिक सेवायोजन कार्यालयामध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
विशेष सचिव (सेवा),महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग.

**सेवा योजन कार्यालय**

**शासनाच्या चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या मुलास/ अविवाहित मुलीस शासनाच्या सेवेत नोकरीसाठी सेवा योजन कार्यालयाच्या शिफारशीची अट रद्द करण्याबाबत........**

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
शासन परिपत्रक क्रमांक. आरटीआर – १०८०/८१९-१२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक:- १० डिसेंबर, १९८१.

**पहा:-** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक, आरटीआर – १०८०/८१९-१२, दिनांक १४ एप्रिल, १९८१.

**शासन परिपत्रक** :- सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक आरटीआर – १०८०/८१९/१२, दिनांक १४ एप्रिल, १९८१ च्या शासन परिपत्रकान्वये असे आदेश देण्यात आले आहेत की, चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचारी अथवा या श्रेणीतील एक वर्षाच्या कालावधीमध्ये निवृत्त होणारे कर्मचारी यांच्या मुलास/अविवाहित मुलीस शासन सेवेतील चतुर्थ श्रेणी पदावरील नोकरीसाठी विशेष बाब म्हणून त्या परिपत्रकात नमूद केलेल्या शर्तीवर सेवा योजन कार्यालयाच्या शिफारशीची अट रद्द करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्या आदेशांच्या संदर्भात बऱ्याच कार्यालयांनी काही मुद्दे उपस्थित केले होते. त्यांचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

| मुद्दे | स्पष्टीकरण |
|---|---|
| 1) चतुर्थ श्रेणीतील सेवा निवृत्ती कर्मचाऱ्यांच्या मुलास/मुलीस नोकरी देताना तो कर्मचारी निवृत्त केव्हा झालेला आहे यावर कालमर्यादेच्या बाबतीत काही बंधन आहे काय? | 1) नाही. दिनांक. १४-४-१९८१ पूर्वी केव्हाही निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना/त्यांच्या मुलांना हे आदेश लागू आहेत. |
| 2) ज्या कार्यालयातून चतुर्थ श्रेणी कर्मचारी निवृत्त झाला असेल, त्याच कार्यालयात त्याच्या मुलास अथवा मुलीस नोकरीत घेणे बंधनकारक आहे काय? | 2) नाही. ज्या शासकीय कार्यालयात चतुर्थ श्रेणीतील पद रिक्त असेल त्या कार्यालयांकडे अशा कर्मचाऱ्यांनी अथवा त्यांच्या मुलांनी परस्पर अर्ज करावयाचा आहे. |
| 3) अशा नेमणुका तात्पुरत्या रिकाम्या होणाऱ्या पदांकरिताच मर्यादित आहेत किंवा कायम स्वरुपाच्या पदांवर अशा नेमणुका करण्याची मुभा आहे? | 3) चतुर्थ श्रेणीतील कोणत्याही स्वरुपाच्या रिक्त पदावर उदा. रजेच्या कारणास्तव किंवा कायम स्वरुपाच्या दीर्घ मुदतीच्या पदावरही नेमणुका करता येतील. |
| 4) चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या मुलाची /मुलीची नेमणूक होण्यापूर्वी जर तात्पुरत्या स्वरुपाच्या (रजेच्या कारणास्तव) नेमणुका झालेल्या असतील तर, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या मुलास | 4) नाही. कोणत्याही कारणासाठी सेवा समाप्ती करणे भाग पडत असेल व रजेच्या मुदतीत केलेल्या नेमणूका नियमानुसार केलेल्या असतील तर, कनिष्ठतेनुसार (Last come first go) या |

सेवेतून कमी न करता, त्यांच्या आधी नोकरीत प्रविष्ट झालेल्या कर्मचाऱ्याला सेवामुक्त करता येईल काय?

सर्वसाधारण तत्वानुसार सर्वात शेवटी नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यास प्रथम सेवामुक्त करावे.

5) जे चतुर्थ श्रेणी कर्मचारी स्वेच्छेने सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांच्या मुलांना सुध्दा त्या सवलतीचा लाभ देता येईल काय?

5) होय.

6) सेवानिवृत्त झालेल्या किंवा एक वर्षाच्या कालावधीमध्ये निवृत्त होणाऱ्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा एक मुलगा आधीच शासन सेवेत असल्यानंतर सुध्दा त्याच्या दुसऱ्या मुलास ह्या आदेशांचा लाभ देता येईल काय ?

6) नाही.

7) सेवानिवृत्त चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा मुलगा/अविवाहित मुलगी वर्ग-३ मधील पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत असेल तर, त्याला/तिला वर्ग-३ मध्ये नेमणूक देता येईल काय?

7) नाही. वर्ग-३ मधील लिपिक वर्गीय पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोग/ प्रादेशिक निवड मंडळे यांच्या कक्षेत येत असल्यामुळे त्यांच्यामार्फत निवड झाल्याशिवाय शासन सेवेतील वर्ग-३ मधील पदावर सदरील योजनेनुसार नेमणूक देता येणार नाही.

8) चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याला मुलगा किंवा मुलगी नसेल तर, त्याच्या इतर नातेवाईकांना त्या आदेशांचा लाभ देता येईल काय?

8) नाही. मात्र अशा कर्मचाऱ्याची पत्नी परिपत्रकात दिलेल्या अटींची पूर्तता करीत असेल तरच तिचा चतुर्थ श्रेणीतील पदावर नेमणुकीसाठी विशेष बाब म्हणून शासनाच्या पूर्व सहमतीने विचार करता येईल.

9) दिनांक १४-४-१९८१ चे आदेश रुपांतरित आस्थापना व इतर आस्थापना (नियम आस्थापना सोडून) लागू आहेत काय?

9) ज्या आस्थापनेवरील चतुर्थ, श्रेणी कर्मचारी स्थायी (confirm) होतात आणि नियत वयोमानाप्रमाणे 60 वर्ष पूर्ण झाल्यावर सेवानिवृत्त होतात त्या आस्थापनेवरील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना हे आदेश लागू आहेत. कार्यव्ययी आणि रोजंदारी आस्थापनेवरील कर्मचारी वरील नियमात बसत नसल्याने त्यांना हे आदेश लागू पडणार नाहीत.

10) दिनांक २३-४-१९७६ च्या आदेशानुसार अनुकंपा कारणास्तव व दिनांक १४-४-१९८१ च्या आदेशानुसार सेवा निवृत्तीच्या कारणास्तव जर दोन उमेदवारांकडून एका जागेसाठी अर्ज आले तर, कोणाचा विचार प्रथम करावयाचा?

10) अनुकंपा कारणास्तव नोकरीसाठी असलेल्या अर्जाचा विचार प्रथम करावा.

2. दिनांक १४-४-१९८१ च्या परिपत्रकातील आदेश काढण्यामागे शासनाने चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचाऱ्यांबाबत सहानुभूतीचे धोरण स्पष्ट आहे. चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या फक्त एकाच मुलाला/अविवाहित मुलीला परिपत्रकातील अटीप्रमाणे लाभ मिळेल हे विभाग प्रमुखांनी/कार्यालय प्रमुखांनी कृपया पहावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
व.अं. कोटेश्वर
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सेवाभरती रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन
केंद्रामार्फत ( सेवायोजन कार्यालये) व प्रसार
माध्यमातून प्रसिध्दी देऊन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन.**
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्र:- संकीर्ण -१००३/प्रक्र-१६/१००३/१३-अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:-११ नोव्हेंबर २००३

वाचा:- १) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही१०८०/११ दि. ७ आक्टोबर,१९८०,

२) शासन निर्णय,शिक्षण व सेवायोजन विभाग,क्र.इएमपी ११८५/५००४७१/(१११)/सेयो-१, दि.१० एप्रिल,१९९१.

३) भारत सरकार, कामगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.डीजीई ॲन्डटी-सी-१८०१८/५/ ९६ -ईई-१, दि.४जुन, १९९८.

## परिपत्रक

संदर्भाधीन अ.क्र.१ व अ.क्र.२ येथील आदेशान्वये शासकीय, निमशासकीय, महामंडळे,सहकारी संस्था, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम इत्यादींच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांमधील तृतीय व चतुर्थ श्रेणीतील रिक्त पदे सेवा योजन केंद्रामध्ये अधिसूचित करणे आणि रिक्त पदांवरील भरती सेवायोजन कार्यालयाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधूनच भरणे नियुक्ती प्राधिका-यांवर बंधनकारक असल्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन क्र. ११६४६/ ११७१४/१९९६ प्रकरणी दि.२२ ऑगस्ट १९९६ रोजी शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी आस्थापनेत रिक्त पदे भरण्याबाबतच्या कार्यपध्दती संबंधी खालील प्रमाणे सूचना दिल्या आहेत":-

" It should be mandatory for the requisitioning authority/establishment to intimate the employment exchange and employment exchange should sponsor the names of the candidates to the requisitioning departments for selection strictly according to seniority and reservation as per requisition. In addition, the appropriate department or undertaking or establishment, should call for the names by publication in the newspapers having wider circulation and also display on their office notice boards or announce on radio, television and employment news bulletins and then consider the cases of all the candidates who have applied

३. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त सूचनांनुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, शासकीय/ निम शासकीय कार्यालये, महामंडळे, सहकारी संस्था, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम इ. च्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांमधील रिक्त पदे भरताना (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येणारी पदे वगळून) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून (सेवायोजन कार्यालये ) ज्येष्ठतेनुसार

यादी प्राप्त करून घेण्यात यावी. त्याचबरोबर रिक्त पदांबाबतची जाहिरात सर्व प्रसार माध्यमांतून (वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे, दूरदर्शन, रेडिओ,नोटीस बोर्ड इ.) प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात यावेत व वरील दोन्ही प्रकारे प्राप्त होणा-या यादयांमधून / अर्जांमधून पात्र उमेदवारांची विहित पध्दतीनुसार निवड करण्यात यावी.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी वरील आदेश त्यांच्या प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना / नियुक्ती प्राधिका-यांना कळवावेत आणि या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल याबाबत दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(चारुशीला सोहोनी)
प्रधान सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन.

**नामनिर्देशनाच्या कोटयातील**
**गट-"ड" ची रिक्त पदे भरणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक: एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१२/०४/बारा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ जून, २००४.

वाचा: १.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.: आरटीआर-१०६८/सी/१००११/जे, दि.२.१२.१९६८.
२.शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.: एसआरव्ही-१०८०/१२, दि.७.१०.१९८०.
३.शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.:संकीर्ण-१००३/प्र.क्र.९६/२००३/१३-अ, दि.१९.११.२००३

## शासन निर्णय

संदर्भाधीन अ.क्र. :१ व अ.क्र. :२ येथील आदेशान्वये सर्व शासकीय,निमशासकीय,स्थानिक स्वायत्त संस्था, महामंडळे व सार्वजनिक उपक्रम इत्यादींच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयातील नामनिर्देशनाच्या कोटयातील गट-ड ची रिक्त पदे सेवायोजन केंद्रामध्ये अधिसूचित करणे आणि रिक्त पदावरील भरती सेवायोजन कार्यालयाने शिफारस केलेल्या उमेदवारामधूनच भरण्याचे नियुक्ती प्राधिका-यावर बंधनकारक असल्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. तसेच संदर्भाधीन अ.क्र. :३ येथील आदेशान्वये उपरोक्त कार्यालयातील गट-ड ची रिक्त पदे भरताना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून (सेवायोजन कार्यालये) ज्येष्ठतेनुसार यादी प्राप्त करुन घेऊन आणि त्याचबरोबर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विविध प्रसारमाध्यमातून ( वर्तमानपत्रे, दुरदर्शन, रेडियो, नोटीसबोर्ड इ.) व्यापक प्रसिध्दी देऊन अर्ज मागवून पात्र उमेदवारांची विहित पध्दतीनुसार निवड करण्यात यावी असे आदेश निर्गमित केले आहेत. तथापि सदर पदे भरताना कोणती पध्दती अनुसरण्यात यावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासंदर्भात शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, यापुढे गट-ड ची रिक्त पदे नामनिर्देशनाने भरताना ७५% लेखी अथवा किमान शैक्षणिक पात्रतेच्या इयत्तेत/परिक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणांद्वारे व २५% तोंडी गुणाद्वारे भरतीची प्रक्रिया करण्यात यावी.

२. लेखी परिक्षेकरिता अथवा जाहिरात प्रसिध्द करण्याकरिता येणारा खर्च नियुक्ती प्राधिका-यांनी आपल्या कार्यालयाकरीता मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सर्व मंत्रालयीन विभागांनी वरील आदेश त्यांच्या प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना/नियुक्ती प्राधिकाऱ्यांना कळवावेत आणि या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जाईल याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
बा.बा. नारायणकर
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

**मा. सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेले निर्णय.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक:एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-२५ ऑगस्ट,२००५.

## परिपत्रक

शासकीय, निमशासकीय, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, स्वायत्त संस्था यामधील गट-अ ते ड मधील सरळसेवेच्या कोटयातील नामनिर्देशनाद्वारे भरावयाची पदे शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड समित्या आणि विविध विभागांनी नियुक्त केलेल्या निवडसमित्या यांच्यामार्फत स्पर्धा परीक्षाद्वारे निवड केलेल्या उमेदवारांमधून भरण्यात येतात. तथापि काही वेळा आयोग पुरस्कृत किंवा निवडसमित्यानी पुरस्कृत केलेले उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे किंवा निवडसूची संपुष्टात आल्यामुळे नियमितरित्या नामनिर्देशनाद्वारे पदे भरणे शक्य होत नाही. तेव्हा तातडीची गरज म्हणून लोकसेवा आयोगाच्या किंवा निवड समित्यांच्या शिफारशीशिवाय काही नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून तीन महिन्याच्या किंवा चार महिन्याच्या तत्वावर तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या केल्या जातात. तथापि अशा तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या विशिष्ट मुदतीनंतर संपुष्टात आणल्या जात नाहीत. त्या दीर्घ काळ चालू राहतात. त्यामुळे असे अस्थायी कर्मचारी सेवेत कायम करण्याची मागणी करतात. त्यांची सदर मागणी मान्य न केल्यास ते न्यायालयात अर्ज दाखल करतात. मात्र संबंधित नियम, आदेश यांचा योग्य आधार घेऊन शासनाची बाजू योग्य रितीने न्यायालयात मांडली जात नाही. तसेच अशा प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय/मा.उच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश न्यायालयांच्या निदर्शनास आणले जात नाही. सबब अशा प्रकरणात निर्णय शासनाविरुध्द लागतात. परिणामी अशा कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत नियमित करावे लागते. अनेक प्रकरणात न्यायालयांच्या निर्देशांचे पालन करण्यासाठी सेवा प्रवेश नियमातील अटी देखील शिथिल कराव्या लागतात.

२. अशाच एका प्रकरणात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच ए.उमरानी विरुध्द रजिस्ट्रार, को.ऑ.सोसायटीज, तामिळनाडू व इतर या सिव्हिल अपिल क्र.१४१३/२००३ आणि ३७७४-७६, ४४४६, ६४१५-१६, ७२८२, ९८५४, ९९३३, १०२४४-४५/२००३, ४४९५/२००४ आणि ४४७/२००४ या प्रकरणी दिनांक २८ जुलै,२००४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार आदेश निर्गमित करण्याची सूचना केली होती. त्यास अनुसरुन सदर प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयातील संक्षिप्त बाबी खालीलप्रमाणे सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत :-

a) Regularisation cannot be mode of recruitment by any State within the meaning of Article 12. It is a settled proposition that the appointment made in violation of the mandatory provision of the statute and in particular ignoring the minimum educational qualification and other qualifications would be wholly illegal and such illegality cannot be cured by taking recourse of regularisation.

b) Those who come by back door should go through that door.

c) Regularisation further cannot be given to the employees whose services are ad-hoc in nature.

d) No regularisation is permissible in exercise of the Statutory power conferred under Article 12 of the Constitution of India when the appointments are in contravention of the statutory rules.

e) No regularisation is permissible in exercise of the statutory power conferred under Article 162 of the Constitution if the appointments have been made in contravention of the statutory rules.

f) It is trite that appointments cannot be made on political considerations and in violation of the Government directions for reduction of establishment expenditure or filling up of vacant posts or creating new posts including regularisation of daily wage employees.

g) There is no scope for regularisation unless the appointments were made on a regular basis.

h) If the employees are appointed for the purpose of a scheme, they do not acquire vested right of continuance after the project is over.

३. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने डॉ.(श्रीमती) चंचल गोयल विरुध्द राजस्थान शासन सिव्हिल अपिल क्र.७७४४/१९९७ याप्रकरणी दिनांक १८/२/२००३ रोजी पारीत केलेल्या आदेशात देखील स्पष्ट केले आहे की, मूळ नियुक्ती विहित मार्गाने केलेली असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही. सदर आदेशात आणखी स्पष्ट केले आहे की, लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदावर तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात नियुक्त केलेला कोणताही कर्मचारी त्या पदावर कितीही वर्षे सेवेत राहिला तरी कायम करण्याचा हक्क सांगू शकत नाही.

४. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील दोन्ही निर्णयातील केवळ ठळक बाबी वर नमूद केलेल्या आहेत. अधिक तपशिलाकरीता संबंधितांनी मा.न्यायालयाचा संपूर्ण निकालांचे अवलोकन करावे, असेही सूचित करण्यात येत आहे.

५. सर्व मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, मा.सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश पाहता सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने/माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहित वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. तसेच अशा कर्मचा-यांनी त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे. तसेच यासंदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील न्याय निर्णयांचा संदर्भ देऊन युक्तीवाद करण्याच्या सुचना सरकारी वकीलांना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

न. कुमार

(नवीन कुमार)

अपर मुख्य सचिव (सेवा)

शासकीय विभाग/कार्यालयातील गट ड मधील नामनिर्देशनाची (सरळसेवेची) पदे भरताना मौखिक परीक्षा न घेता लेखी परीक्षा घेऊन पदभरती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय, क्रमांक:एसआरव्ही-२०१२/प्र.क्र. १२४/१२.

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक- १२.३.२०१३.

वाचा (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-१००३/ प्र.क्र.९६/२००३/१३-अ, दि.१९.११.२००३.

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१२/०४/१२, दि.७.६.२००४.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रानिमं-१०११/ प्र.क्र.९९/११/१३-अ, दि:२६.१२.२०११.

(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१८६/१२, दि.२५.७.२०१२.

**प्रस्तावना :-**

शासकीय / निमशासकीय कार्यालयातील तसेच महामंडळे, स्वायत्त संस्था इ. च्या अधिपत्याखालील कार्यालयातील रिक्त पदे भरताना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून यादी मागवून तसेच रिक्त पदांची जाहीरात सर्व प्रसार माध्यमातून प्रसिध्द करुन अर्ज मागवून, वरीलप्रमाणे यादीतून व अर्जांमधून पात्र उमेदवारांची विहित पध्दतीनुसार निवड करण्याचे आदेश संदर्भाधीन अ.क्र.१ येथील शासन परिपत्रकान्वये दिले आहेत. गट ड ची रिक्त पदे नामनिर्देशनाने भरताना अवलंबवयाच्या कार्यपध्दतीबाबत संदर्भाधीन अ.क्र.२ येथील शासन निर्णयान्वये आदेश दिले आहेत. भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील, गट क मधील नामनिर्देशनाची पदे भरताना मौखिक परीक्षा न घेता लेखी परीक्षा घेऊन पदभरती करण्याबाबत संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत संदर्भाधीन अ.क्र.३ येथील शासन निर्णयान्वये आदेश दिले आहेत. याप्रमाणेच गट ड मधील नामनिर्देशनाची पदे भरताना मौखिक परीक्षा न घेता लेखी परीक्षा घेऊन पदभरती करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

शासनाने असा निर्णय घेतला आहे की, " गट ड मधील एखाद्या संवर्गातील पदभरती करताना, मुलाखती न घेता केवळ लेखी परीक्षेच्या आधारे निवडयादी तयार करण्याबाबत

मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची खात्री झाली असल्यास जाहीरात देण्यापुर्वी म्हणजेच भरती प्रक्रीया सुरु करण्यापुर्वी त्यांनी शासन मान्यतेने दि.७.६.२००४ च्या शासन निर्णयामधील गुणमर्यादेच्या अधीन राहून फक्त लेखी परीक्षेच्या आधारे निवडयादी तयार करुन त्याआधारे भरती करण्याचा निर्णय **संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागास त्यांच्या स्तरावर घेता येईल.** मात्र फक्त लेखी परीक्षेच्या आधारे भरती करण्यामुळे काही आक्षेप आल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास **त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची राहील.**" तसेच पदभरतीसंदर्भात संदर्भाधीन अ.क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये दिलेल्या आदेशाचे व याअनुषंगाने वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशाचे पालन करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१३०३१२१५४४२७३६०७ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(के.पी.बक्षी)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

**शासकीय विभाग/कार्यालयातील गट अ ते गट ड संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्यासाठी विहित केलेली प्रतिवर्षी मंजूर पदांच्या कमाल ३ टक्के ची मर्यादा रद्द करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.४५/१२,**

मादाम कामा मागग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

तारीख: ३ जून, २०१४.

वाचा -

**१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-२०१२/ प्र.क्र.१८६/१२, दि.२५.७.२०१२.**

**२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-२०१२/ प्र.क्र.१८६/१२, दि.२८.२.२०१३.**

प्रस्तावना -

शासकीय विभाग/कार्यालयातील गट अ ते गट ड मधील सरळसेवा कोटयातील पदांपैकी, मंजूर पदांच्या प्रतिवर्षी कमाल ३ टक्के इतक्या कमाल मर्यादेपर्यतच रिक्त पदे विहित कार्यपध्दतीने भरण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यांना राहतील असे आदेश संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये दिले आहेत. तसेच सरळसेवेची पदे प्रतिवर्षी मंजूर पदांच्या कमाल ३ टक्केपेक्षा जास्त प्रमाणात भरण्याची आवश्यकता असल्यास, या शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे प्रस्ताव पूर्ण समर्थनासह ठेवण्याची मुभा प्रशासकीय विभागांना दिली आहे.

२. शासन सेवेतील गट अ व गट ब (राजपत्रित) ची दि.३१ डिसेंबर २०१४ अखेरपर्यत रिक्त होणारी पदे भरण्यासाठी, मागासवर्गीयांच्या अनुशेषाची व अपंग अनुशेषाची गट अ ते गट ड ची पदे भरण्यासाठी प्रतिवर्षी कमाल ३ टक्के ची मर्यादा संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये यापुर्वीच शिथिल केली आहे. तसेच ज्या संवर्गात मंजूर पदसंख्येनुसार सरळसेवा कोटयात येणारी पदे ३५ वा त्यापेक्षा कमी आहेत अशा संवर्गातील पदे या मर्यादेतून वगळली आहेत. त्यामुळे गट ब(अराजपत्रित), गट क व गट ड मधील ज्या

संवर्गातील सरळसेवा कोटयातील पदे ३५ पेक्षा जास्त आहेत अशा संवर्गातील, मागासवर्गीयांच्या/अपंग अनुशेषाची पदे वगळून उर्वरीत पदे भरण्यास मान्यतेचे प्रस्ताव प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर ठेवण्यात येतात. मात्र प्रस्ताव सदर समितीसमोर ठेवणे, समितीने पदभरतीबाबत शिफारस केल्यावर त्यास मा.प्रभारी मंत्री व मा.मुख्यमंत्री यांची मान्यता घेऊन पदभरतीची कार्यवाही करणे यास बराच कालावधी लागतो. यास्तव संदर्भाधीन क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये दिलेले आदेश रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय -**

३. यासंदर्भात शासन खालीलप्रमाणे निदेश देत आहे. :-

१) सरळसेवेची पदे प्रतिवर्षी मंजूर पदांच्या कमाल ३ टक्के मर्यादेपर्यंत भरण्याबाबत संदर्भाधीन क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये दिलेले आदेश याअन्वये रद्द करण्यात येत आहेत. यामुळे नियुक्ती प्राधिकाऱ्यांना त्यांच्या अधिपत्याखालील गट अ ते गट ड संवर्गातील सरळसेवा कोटयातील रिक्त पदे विहित कार्यपध्दतीने भरण्याची कार्यवाही करता येईल.

२) संबंधित आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध निश्चित/सुधारीत करणे, विशिष्ट कालावधीपेक्षा जास्त काळ रिक्त राहीलेली पदे व्यपगत होणे आणि व्यपगत झालेली पदे पुनर्जिवित करणे याबाबत वित्त विभागाने वेळोवेळी दिलेले आदेश विचारात घेऊन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विहित कार्यपध्दतीने करणे आवश्यक राहील.

३) संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या समितीसमोर यापुर्वीच ठेवलेल्या प्रस्तावावर समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने उचित स्तरावरुन मान्यता घेऊन पदे भरण्यासाठी जाहीरात दिली असेल अशा संवर्गातील उर्वरीत रिक्त पदे पुढील भरतीप्रक्रीयेमध्ये भरण्यात यावी. ज्या संवर्गातील पदे भरण्यासाठी अद्याप जाहीरात दिलेली नाही, अशा संवर्गातील सर्व रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करता येईल. मात्र वरील (२) येथील आदेशाच्या अधीन राहून ही कार्यवाही करण्यात यावी. तसेच एकुण रिक्त पदांसाठी आरक्षण निश्चितीची कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करताना, सदर पदांसाठी अपेक्षित खर्चाची तरतूद असल्याची खात्री करणे आवश्यक राहील. तसेच अपेक्षित खर्चाची तरतूद नसल्यास त्याबाबत वित्त विभागाशी विचारविनिमय करुन कार्यवाही करावी.

४. सर्व प्रशासकीय विभाग, विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख यांनी वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करुन रिक्त पदे विहित कार्यपध्दतीने भरण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०६०३१६५९०९४९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Sahai

Digitally signed by Bhagwan Sahai
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Sahai
Date: 2014.06.03 17:29:54 +05'30'

(डॉ.भगवान सहाय)

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

# मूळ नियुक्तीसाठी अर्हता प्राप्त नसलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

भाग

४

जे शासकीय कर्मचारी त्यांच्या मूळ नेमणुकीसाठी पात्र नव्हते अथवा अर्हताप्राप्त नव्हते असे नंतर आढळून येईल त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्र.सीडीआर-१०९३/२०७७/प्र.क्र.२३/९३/अकरा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक :- १२ ऑक्टोबर १९९३.

**नि र्ण य**

शासकीय सेवकांनी त्यांच्या नेमणुकीपूर्वी केलेल्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. साधारणतः शासकीय सेवकांनी त्यांच्या नेमणुकीच्या वेळी खोटी माहिती दिल्यास त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी साक्षांकन नमुन्यात समाविष्ट केलेल्या "ताकिद" या तरतुदीचा वापर संबंधित विभाग/कार्यालय यांनी करावयाचा असतो.

२. आता असा प्रश्न उपस्थित झाला आहे की, एकदा शासकीय सेवक त्याच्या शासन सेवेतील मूळ नेमणुकीसाठी पात्र नव्हता अथवा अर्हताप्राप्त नव्हता असे नंतर आढळून आल्यास अशा कर्मचाऱ्याला सेवेतून मुक्त करता येईल काय, याबाबत सर्वोच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी, विझियानगरम विरुद्ध एम. त्रिपुर सुंदरी देवी (१९९०/(४) एसएलआर-२३७) या प्रकरणात या मुद्दयांचा विचार केला असून पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

"त्याखेरीज सर्व संबंधितांनी याचीही जाणीव ठेवली पाहिजे की, ज्यावेळी जाहिरातीमध्ये विशिष्ट अर्हता नमूद केलेली असते आणि एखादी नेमणूक तिच्याकडे दुर्लक्ष करुन करण्यात येते त्यावेळी ते प्रकरण केवळ नियुक्ती प्राधिकारी व नियुक्त व्यक्ती यांच्या पुरतेच रहात नाही. ज्यांच्याकडे नियुक्त व्यक्ती अथवा व्यक्तींच्या अर्हतेसमान अथवा त्यापेक्षा जास्त अर्हता असेल. परंतु जाहिरातीत नमूद केलेली अर्हता नसल्यामुळे ज्यांनी अर्ज केले नसतील असे सर्वजण व्यथित असतात. अशा परिस्थितीत, अर्हता शिथिल करता येईल असे जर स्पष्टपणे नमूद केलेले नसेल तर, अशा कमी दर्जाची अर्हता असणाऱ्या व्यक्तीची नेमणूक करणे ही जनतेची फसवणूक होईल. असे फसवणुकीचे व्यवहार चालू ठेवण्यात कोणत्याही न्यायालयाने सहभागी होऊ नये."

त्यानुसार आता असे ठरविण्यात आले आहे की, ज्या प्रकरणात असे आढळून येईल की, एखादा शासकीय कर्मचारी शासन सेवेतील मूळ नेमणुकीसाठी संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीप्रमाणे पात्र नव्हता अथवा विहित अर्हताप्राप्त नव्हता. अथवा त्याने नेमणूक मिळण्यासाठी खोटी माहिती दिली होती अथवा खोटे प्रमाणपत्र सादर केले होते, त्या कर्मचाऱ्याला सेवेत ठेवण्यात येऊ नये. जर तो परिवीक्षाधीन अथवा अस्थायी शासकीय कर्मचारी असेल तर त्याला सेवामुक्त करण्यात यावे अथवा त्याच्या सेवा समाप्त करण्यात याव्यात. जर तो स्थायी शासकीय कर्मचारी असेल तर त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ मध्ये विहित केल्याप्रमाणे विभागीय चौकशी करण्यात यावी आणि आरोप सिद्ध झाल्यास त्या शासकीय कर्मचाऱ्यास सेवेतून काढून टाकावे अथवा सेवेतून बडतर्फ करावे, परंतु कोणत्याही परिस्थितीत यापेक्षा कोणतीही वेगळी शिक्षा लादू नये.

३. अशा प्रकारची सेवामुक्ती, सेवासमाप्ती, सेवेतून काढण्याची कारवाई अथवा बडतर्फीची कारवाई केल्यामुळे सदरहू शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध न्यायालयात खटला भरण्याच्या शासनाच्या अधिकारास बाधा येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. ग. मंडपे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.
सामान्य प्रशासन विभाग

Action against Government Servants to be taken if they are later found ineligible or unqualified for their initial recruitment.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
General Administration Department,
Resolution No.CDR-1093/1077/CR-23/93/XI
Mantralaya, Bombay-400 032, Dated the 12th October, 1993.

**RESOLUTION**

The question of taking action against the Governement Servants in respect of misconduct committed before their employment has been under considertation of Government for some time past. Normally the Department/Office is required to make use of the provision of 'Warning' inserted in the Attestation Form for taking action against the Government Servant furnishing false information at the time of appointment.

2. A question has now arisen as to whether a Governemtn servant can be discharged from service where it is discovered later that the Government servant was not qualified or eligible for his initial recruitment in service. The Supremen Court in its judgement in the District Collector, Vizianagaram Vs. M. Tripura Sundari Devi (1990 (4) SLR 237) went into this issue and observed as under :-

"It must further be realised by all concerned that when an advertisement mentions a particular qualification and an appointment qualification and an appointment is made in disregard of the same, it is not a matter only between the appointing authority and the appointee concerned. The aggrieved are all those who had similar or better qualifications than the appointee or appointees but who had not applied for the post because they did not possess the qualified for the post because they did not possess the qualifications mentioned in the advertisement. It amounts to a fraud on public to appoint a person with inferior qualifications in such circumstances unless it is clearly stated that the qualifications are relaxable. No Court should be a party to the prepetuation of the fraudulent practice."

It has now been decided that wherever it is found that a Government servant, who was not qualified or eligible in terms of the recruitment rules etc. for initial recruitment in service or had furnished false information or produced a flse certificate in order to sercure appointment, he should not be retained in service. It he is a probationer or a temporary Government servant, he should be discharged or his services should be terminated. It he has become a permanent Government servant, an inquiry as prescribed in Rule 8 of the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979 may be held and if the charged are proved, the Government servant should be removed or dismissed from service. In no circumstances should any other penalty be imposed.

3. Such discharge, termination, removal or dismissal from service would, however, be without prejudice to the right of the Government to prosecute such Government servants.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. G. MANDPE,
Deputy Secretary to the Government of Maharashtra,
General Administration Department.

जे शासकीय कर्मचारी त्यांच्या मूळ नेमणुकीसाठी पात्र नव्हते अथवा अर्हताप्राप्त नव्हते असे नंतर आढळून येईल त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्र.सीडीआर-१०९५/९९५/प्र.क्र.३/९६/अकरा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक :- ३१ ऑक्टोबर १९९६.

वाचा:- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३/अकरा, दिनांक १२ आक्टोबर, १९९३.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.२८/९४/१६-ब, दिनांक १५ डिसेंबर १९९५.

निर्णय :- शासकीय सेवकांनी त्यांच्या मूळ नेमणुकीच्यावेळी खोटी माहिती दिल्यास अथवा ते मूळ नेमणुकीस अर्हताप्राप्त नव्हते, असे निदर्शनास आल्यास त्यांचेविरुद्ध करावयाच्या कारवाईबाबत उपरोक्त दिनांक १२ आक्टोबर, १९९३ च्या निर्णयानुसार सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. (प्रत संलग्न) या शासन निर्णयात मूळ नेमणुकीनंतर सेवेत असताना पदोन्नतीच्या फायद्यासाठी खोटे प्रमाणपत्र सादर केल्याचे निदर्शनास आल्यास काय कार्यवाही करावी याबाबतच्या सूचना नाहीत.

२. वरील मुद्दयाबाबत असे ठरविण्यात आले आहे की, "जर एखाद्या शासकीय सेवकाने मूळ नेमणुकीनंतर पदोन्नतीच्या फायद्यासाठी जातीचे खोटे प्रमाणपत्र दाखल करुन पदोन्नती मिळविली असेल आणि सदर बाब नंतर काही कालांतराने निदर्शनास आल्यास त्या कर्मचाऱ्याच्या पदोन्नतीचे आदेश तात्काळ रद्द करण्यात यावेत व त्याला त्याच्या मूळ पदावर पदावनत करावे. तसेच संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही तात्काळ सुरु करण्यात यावी."

३. याविषयी असेही स्पष्ट करण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिनांक १२ आक्टोबर, १९९३ च्या आदेशातील माहिती मूळ नेमणुकीच्या वेळेची असल्याने ती वय, अर्हता अथवा जात यापैकी कोणत्याही मुद्यांबाबत असू शकते. परंतु, पदोन्नतीच्या वेळी विचारात घ्यावयाचे प्रमाणपत्र केवळ मागासवर्गीयांसाठीच्या राखीव जागांच्या आदेशांच्या अनुषंगाने त्यांच्यातील प्रवर्गापुरते मर्यादित असते. त्यानुसार वरील परिच्छेद २ मधील सूचना केवळ ज्या प्रकरणात जातीचे खोटे प्रमाणपत्र दाखल केल्याचे आढळून येईल अशा प्रकरणांना लागू होते.

४. दिनांक १५ जून, १९९५ पूर्वी विशेष मागास प्रवर्गातील ज्या व्यक्तींनी या आधीच अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय/निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती प्राप्त केली आहे अशांना शासन निर्णय क्रमांक-बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ डिसेंबर, १९९५ (प्रत संलग्न) मध्ये स्पष्ट केल्यानुसार पदावनत करण्यात येऊ नये किंवा सेवेतून काढून टाकण्यात येऊ नये. दिनांक १५ जून, १९९५ च्या नंतर विशेष मागास प्रवर्गातील ज्या व्यक्ती अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेत प्रवेश मिळवतील किंवा पदोन्नत होतील अशा कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे खोटी आढळल्यास त्यांच्याविरुद्ध परिच्छेद २ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. द. कासार,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

# शासन सेवेत प्रवेशासाठी विविध विद्यापीठे/स्वायत्त संस्था इ. च्या पदव्या ग्राह्य धरणेबाबत

भाग ५

लघुटंकलेखक/निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी) या पदांवरील नियुक्तीसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून प्रशिक्षणानंतर घेण्यात येणारी राज्य व्यावसायिक प्रशिक्षण परिषदेची परीक्षा शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षेशी समकक्ष ठरविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक आरजीडी-1393/885/तेरा,

मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 4 नोव्हेंबर 1993.

**पहा :-** शासन निर्णय, शिक्षण विभाग क्रमांक टीएसए-1074/91053/टी, दिनांक 23 ऑगस्ट 1974.

**शासन निर्णय :-** राज्य व्यावसायिक प्रशिक्षण परिषदेमार्फत मराठी लघुलेखनासाठी 100 शब्द प्रति मिनिट आणि टंकलेखनासाठी 30 शब्द प्रति मिनिट या गतीच्या परीक्षा घेण्यात येतात. शासकीय/निम-शासकीय सेवेतील लघुटंकलेखक, तसेच लघुलेखक (निम्नश्रेणी) पदांवरील नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमांत व्यावसायिक अर्हतेसाठी निश्चित करण्यात आलेल्या गतीशी सदर गती समतुल्य असल्याने सदर परीक्षांसाठी देण्यात येणारे प्रमाणपत्र या पदांच्या सेवा भरतीसाठी शासकीय वाणिज्य प्रमाणपत्रांशी समकक्ष ठरविण्यात येत आहे.

2. सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी या आदेशांची नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य. मा. जोशी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

लघु-टंकलेखक/निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी) या पदावरील नियुक्तीसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून प्रशिक्षणानंतर घेण्यात येणारी राज्य व्यावसायिक प्रशिक्षण परिषदेची परीक्षा शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षेशी समकक्ष ठरविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शुध्दीपत्रक क्रमांक-आरजीडी-1393/885/तेरा,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 18 ऑक्टर, 1994.

